# महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग
# Maharashtra Electricity Regulatory Commission

माहितीचा अधिकार

स्वच्छ भारत
एक कदम स्वच्छता की ओर

MERC/ADM/RTI/056/2022/ **0425**    Dt.14.09.2022

प्रति,
जन माहिती अधिकारी (ऊर्जा ५),
महाराष्ट्र शासन, उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग,
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक,
मंत्रालय, मुंबई - ३२.

विषय :- श्री. विजय निवृत्ती पाटील यांनी माहिती अधिकार अधिनियम २००५ अन्वये केलेला अर्ज कलम ६(३) अन्वये हस्तांतरित करण्याबाबत..

महोदय,

श्री. विजय निवृत्ती पाटील यांचा माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या अंतर्गत दि.०५.०९.२०२२ रोजीचा अर्ज, आयोगाच्या कार्यालयाला दि.०८.०९.२०२२ रोजी प्राप्त झालेला आहे. सदर अर्जातील शासन निर्णय, परिपत्रके बाबतची माहिती ही आपल्या कार्यालयाशी संबंधीत असल्याने सदर माहितीचा अर्ज, माहिती अधिकार अधिनियम २००५ च्या कलम ६(३) अन्वये आपल्या कार्यालयास हस्तांतरित करण्यात येत आहे. सदर अर्जातील माहिती अपिलार्थी यांना परस्पर लवकरात लवकर उपलब्ध करुन द्यावी व त्याची एक प्रत आयोगाच्या कार्यालयास पाठविण्यात यावी, ही विनंती.

सदर अर्ज दि.१२.०९.२०२२ रोजी महाराष्ट्र शासन, उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग, ऊर्जा २ या विभागाकडे हस्तांतरित करण्यात आला होता. सदर अर्ज महाराष्ट्र शासन, उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग, ऊर्जा २ या विभागाशी संबंधीत नसून सदर अर्ज महाराष्ट्र शासन, उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग, ऊर्जा ५ यांचेशी संबंधीत असल्याचे दुरध्वनीद्वारे दि.१४.०४.२०२२ रोजी कळविले असल्यामुळे, सदर अर्ज पुनश्चः महाराष्ट्र शासन, उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग, ऊर्जा ५ यांचेकडे हस्तांतरित करण्यात येत आहे.

माहिती अधिकार अधिनियम २००५ चे कलम १९ (१) अन्वये श्री. अनिलकुमार ऊके, संचालक (विधी) अतिरिक्त कार्यभार /प्रथम अपीलीय अधिकारी आहेत, पत्ता:- महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग, जागतिक व्यापार केंद्र, सेंटर १, १३ वा मजला, कफ परेड, मुंबई - ४००००५. टेलिफोन नं. ०२२-२२१६३९६४/६५/६९ **Email: anilkumar.ukey@merc.gov.in.**

आपला विश्वासू,

(अरूण वाळुंज)
जन माहिती अधिकारी तथा अवर सचिव

**सोबत**: अर्जाची छायांकित प्रत.

**प्रत,**
श्री. विजय निवृत्ती पाटील,
जिल्हा अध्यक्ष, शेतकरी संघटना क्रांतीसिंह नाना पाटील ब्रिग्रेड,
मु.पो. काले, बाजार पेठ, दत्त मंदिर जवळ,
ता. कराड, जि. सातारा, महाराष्ट्र.
पिन नं. ४१५१०४.

(सदर अर्जातील महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग, मुंबई कार्यालयाकडील नियमावली बाबतची माहिती आयोगाच्या www.merc.gov.in या संकेतस्थळावर उतरवून घेण्याच्या स्वरूपात उपलब्ध आहे).

(अरूण वाळुंज)
जन माहिती अधिकारी तथा अवर सचिव


१३वा मजला, केंद्र क्र. १, जागतिक व्यापार केंद्र, कफ परेड, मुंबई - ४०० ००५.
13th Floor, Centre No. 1, World Trade Centre, Cuffe Parade, Mumbai - 400 005.
**Tel.:** 022-2216 3964 / 2216 3965 / 2216 3969 **Fax :** 022-2216 3976
**E-mail :** mercindia@merc.gov.in **Website :** www.merc.gov.in